


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १६३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२५ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जनगणना सूचीत ओबीसी नाही! जातनिहायच्या घोषणेबाबत समाजात संभ्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, नागपूर :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीसोबतच ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचे केंद्र सरकारने जाहीर केले होते. यासंदर्भात २२ जानेवारीला राजपत्र जारी करीत जनगणनेसंबंधी ३३ सूची जाहीर करण्यात आल्या. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीचा उल्लेख आहे; मात्र ओबीसींचा उल्लेख नाही. यामुळे ओबीसी समाजात संभ्रम निर्माण झाला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या ३० मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय रेल्वे तथा माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली होती. ऑक्टोबर २०२६पासून जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये; तर उर्वरित भागात मार्च २०२७पासून जनगणना सुरू करण्यात येणार असल्याचे १६ जून २०२५ला स्पष्ट करण्यात आले होते. नंतर रजिस्ट्रार जनरल आणि जनगणना आयुक्त यांनी जनगणनेसंबंधी अधिसूचना काढली होती. सात जानेवारीला राजपत्र जारी केले गेले. २२ जानेवारीला जनगणना करण्यासाठी ३३ सूची तयार करून राजपत्रात समाविष्ट करण्यात आल्या. यामध्ये घर क्रमांक, जनगणना घर क्रमांक, सामग्री, घराची स्थिती, कुटुंब क्रमांक, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंबप्रमुखाचे नाव, त्याचे लिंग, विवाहित दाम्पत्यांची संख्या, खोल्यांची संख्या, पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्रोत, पेयजलाची उपलब्धता, वीज, शौचालय, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट, लॅपटॉप किंवा कम्प्युटर, मोबाइल, कार, मुख्य धान्य अशा विविध बाबींचा समावेश केला आहे. बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करण्यात आला. इतरांसाठी अन्य शब्दाचा प्रयोग करताना ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नाही.



> राजपत्रातील बाराव्या सूचीत अनुसूचित जाती आणि जमातीचा उल्लेख करताना इतरांसाठी अन्य शब्द वापरण्यात आला आहे. ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख कुठेही नाही. केंद्र सरकारने ओबीसी समाजाला दिलेले आश्वासन पाळावे.
>
> **– सचिन राजूरकर, महासचिव, राष्ट्रीय ओबीसी महासंघ**

**तज्ज्ञांचे म्हणणे काय ?**

१९४८च्या कायद्यात दुरुस्ती केल्याशिवाय जातनिहाय जनगणना करणे शक्य नाही. या कायद्यात केवळ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि धर्मावर आधारित (हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध) जनगणना होते. आता जातनिहाय जनगणना करण्यासाठी जुन्या कायद्यात दुरुस्ती करावी लागणार आहे. हीच अडचण येत असल्याने राजपत्रात ओबीसींचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आला असावा, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## संजय राऊतांना कॅन्सरचं निदान, स्वत: मुलाखतीत दिली माहिती



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे डॅशिंग खासदार संजय राऊत हे गेल्या काही महिन्यांपासून आजारी आहेत. गेल्या वर्षी दिवाळीत त्यांना गंभीर आजाराचं निदान झालं होतं. संजय राऊत यांनी स्वत: ट्विट करत याबाबत माहिती दिली होती. आपल्याला फार गंभीर आजाराचं लागण झाल्याची माहिती स्वत: खासदार संजय राऊत यांनी दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संजय राऊतांच्या प्रकृतीची विचारपूस केल्याची माहिती समोर आली होती. पण संजय राऊत यांना नेमकं कोणत्या आजाराने ग्रासले आहे? याची माहिती समोर आली नव्हती. त्यांच्या कार्यकर्ते, चाहत्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये चिंतेची लाट पसरली होती. पण हार मानतील ते राऊत कुठे? संजय राऊत यांनी या आजारावर बऱ्यापैकी मात मिळवत पुन्हा कमबॅक केलं. संजय राऊत यांनी आता स्वत: आपल्याला झालेल्या आजाराची माहिती दिली आहे. संजय राऊत यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. तसेच त्यांच्यावर रुग्णालयात काही दिवस उपचार देखील करण्यात आल्याची माहिती समोर आली होती. यानंतर संजय राऊत यांचा चेहऱ्यावर मास्क असलेला फोटो समोर आला होता. पण संजय राऊत यांना नेमकं कोणत्या आजाराने ग्रासलं आहे? ते सर्वसामान्य जनतेला माहिती नव्हतं. पण आता स्वत: संजय राऊत यांनी 'एबीपी माझा'ला दिलेल्या मुलाखतीत आपल्या आजारपणावर भाष्य केलं आहे. अनेकांना ज्या आजाराची शंका होती त्याच आजाराचं निदान संजय राऊत यांना झाल्याचं स्पष्ट झालं आहे. संजय राऊत यांनी सविस्तर याबाबत माहिती दिली.

संजय राऊत यांनी मुलाखतीत सत्ताधारी भाजप आणि शिवसेना पक्षांवर सडकून टीका केली. यावेळी संजय राऊत यांना राजकारण वगळता वैयक्तिक आयुष्यातील लढाईबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर संजय राऊत यांनी महत्त्वाची माहिती दिली.

**संजय राऊत नेमकं काय म्हणाले?**

● नाही, मला कॅन्सर झाला ना? त्यात काय? दिवाळीच्या दोन-चार दिवस आधी कॅन्सरचं निदान झालं. माझे भाऊ आमदार सुनील राऊत यांनी माझं रक्त चेक केलं. त्यातून ते निष्पन्न झालं की, मला पोटात कॅन्सर आहे. त्यातून आता मी बाहेर यायचा प्रयत्न करतोय. मला जेव्हा जेव्हा शक्य झालं तेव्हा मी बाहेर आलो. उभा राहिलो. अजून काही उपचार सुरु आहेत. काही सर्जरी व्हायच्या आहेत. पण त्या होतील. एवढ्या सर्जरी आपणही करतो. हे आपल्या शरीरातील सर्जरी आहे, अशी महत्त्वाची प्रतिक्रिया संजय राऊत यांनी दिली आहे.

## 'बजाज पुणे ग्रँड टूर- २०२६' चा यशस्वी समारोप

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, पुणे :** 'बजाज पुणे ग्रँड टूर- २०२६' या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाने पुण्याचे नाव जगात पोहोचले. प्रशासनाने गेले सहा महिने या स्पर्धेसाठी खूप मेहनत व तयारी केली, अशा शब्दात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी स्पर्धेच्या समारोपप्रसंगी प्रशासनाचे कौतुक केले.

'बजाज पुणे ग्रँड टूर- २०२६' च्या अंतिम टप्प्यासह स्पर्धेच्या यशस्वी समारोप आज बालगंधर्व रंगमंदीर समोर झाला. त्यानंतर झालेल्या पारितोषिक वितरण समारंभाला केंद्रीय युवक कार्य व क्रीडा राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे, खासदार मेधा कुलकर्णी, युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलच्या (युसीआय) महासंचालक अमीना लानाया, युसीआयचे उपाध्याक्ष व आशियाई सायकलिंग महासंघाचे (एसीसी) अध्यक्ष दातो अमरजीत सिंग गिल, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे (सीएफआय) महासचिव मनिंदर पाल सिंग, अभिनेता अमीर खान, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, बजाज ऑटोचे व्यवस्थापकीय संचालक राजीव बजाज, पंचशील रियाल्टीचे चेअरमन अतुल चोरडिया, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक**

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या नेतृत्त्वाखाली स्पर्धेचे चांगले नियोजन झाले. या स्पर्धेच्या यशाचे श्रेय कुणाला जात असेल तर ते श्री. डूडी यांना जाते अशा शब्दात त्यांनी विशेष कौतुक केले. पुणेकरांनी इतका मोठा खेळ उपक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान दिले. पुढील वर्षीही खूप मोठा इव्हेंट आयोजित केला जाईल, असेही ते म्हणाले.



राज्यमंत्री श्रीमती खडसे सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देऊन म्हणाल्या, भारत हे आता खेळांसाठी एक चांगले ठिकाण झाले आहे. आपले राष्ट्र खेळसंस्कृतीकडे वाटचाल करत आहे याचा जास्त आनंद आहे.

यावेळी युसीआयच्या महासंचालक श्रीमती लानाया यांनी स्पर्धेचे अत्यंत यशस्वी आयोजन झाल्याचे सांगून स्पर्धेला प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असे सांगितले. येथे सायकलिंगला चालना मिळेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी श्री. गिल तसेच अभिनेता अमीर खान यांनीही स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजकांचे अभिनंदन केले. श्री. बजाज, श्री. चोरडिया यांनीही मनोगत व्यक्त केले.

## 'दैं.अक्षराज' च्या बातमीचा इम्पॅक्ट

### बाभुळगावात अखेर घंटागाडी सुरू; ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२४, येवला (नाशिक)** : येवला येथील बाभुळगाव (खु./बु.) परिसरात गेल्या काही दिवसांपासून कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर झाली होती. कचरा टाकण्यासाठी योग्य सुविधा नसल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. या समस्येला 'दै.अक्षराज' ने आपल्या बातमीतून वाचा फोडली होती. विशेष म्हणजे 'न्यायभूमी'चे संपादक अभय बाळासाहेब पाटील यांनी ग्रामपंचायतीचा हा प्रश्न गांभीर्याने उचलून धरला आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून हा घंटागाडीचा प्रश्न मार्गी लावला. या बातमीची, संपादकांच्या पाठपुराव्याची आणि नागरिकांच्या निवेदनाची तातडीने दखल घेत ग्रामपंचायतीने गावात घंटागाडी सेवा सुरू केली आहे.

बाभुळगाव येथील म्हसोबा नगर आणि परिसरातील रहिवाशांना कचरा टाकण्यासाठी कोणतीही सुविधा उपलब्ध नव्हती. या समस्येचे निराकरण व्हावे यासाठी स्थानिक नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय, सरपंच, उपसरपंच, सदस्य तसेच ग्रामसेवक यांना निवेदन देऊन सतत पाठपुरावा केला होता. प्रसिद्ध झालेल्या बातमीचा परिणाम आणि संपादकांचा पाठपुरावा यामुळे ग्रामपंचायतीने त्वरित हालचाल करत घंटागाडी सुरू करण्याचा निर्णय घेतला.

ही सेवा सुरू झाल्यामुळे बाभुळगाव म्हसोबा नगर येथील रहिवाशांनी समाधान व्यक्त केले असून, ग्रामपंचायत कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यापुढेही अशीच तत्पर सेवा मिळावी, अशी अपेक्षा यावेळी नागरिकांनी व्यक्त केली.

या तत्पर कार्यवाहीबद्दल सरपंच रमा गायकवाड, उपसरपंच सुनिता गायकवाड, सदस्य - शरद बोरनारे, रविंद्र बोरनारे, मिना वाबळे, वैशाली वाबळे, कविता सोनवणे, संजय गादीकर, बापु भालेराव, रेखा बनसोडे, बाबुराव आहीरे, तसेच ग्रामसेवक प्रवीण पठारे, कर्मचारी रवी गायकवाड यांचे ग्रामस्थांनी विशेष आभार मानले आहेत.

## पर्यावरणशील दृष्टीकोन जपत ८३८ श्रीगणेश मूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माघी गणेशोत्सवात प्रतिष्ठापना केलेल्या प्राधान्याने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या श्रीमूर्तींचे विसर्जन आपल्या नजिकच्या कृत्रिम विसर्जन तलावातच करावे तसेच शाडूच्या मूर्तींचेही विसर्जन पर्यावरणशील दृष्टीकोन जपत कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले होते.

त्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमूर्ती विसर्जनासाठी नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या ठिकाणी २२ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती केली होती. परिमंडळ उपआयुक्तांच्या नियंत्रणाखाली सर्व विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त आणि त्यांची यंत्रणा सज्ज ठेवण्यात होती.

त्यास अनुसरुन संपूर्ण महापालिका क्षेत्रात माघी गणेशोत्सवातील एकूण १४३० श्रीमूर्तींचे विसर्जन झाले. त्यामध्ये कृत्रिम विसर्जन तलावात ६८ शाडूच्या आणि ७७० पीओपीच्या अशा ८३८ श्रीमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.



यामध्ये कृत्रिम विसर्जन तलावात बेलापूर विभागात १०६ पीओपी मूर्ती, नेरुळ विभागात १००, वाशी विभागात ८२, तुर्भे विभागात ७०, कोपरखैरणे विभागात ९५, घणसोली विभागात २००, ऐरोली विभागात ७४ व दिघा विभागात ३३ अशा प्रकारे आठ विभागांत २२ कृत्रिम विसर्जन तलावांवर एकूण ७७० पीओपी मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली दोन्ही परिमंडळात उपायुक्त सोमनाथ पोटरे व संजय शिंदे यांच्या माध्यमातून सर्व आठही विभागांच्या विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत सर्वच नैसर्गिक व कृत्रिम विसर्जन स्थळांवर विसर्जनासाठी आवश्यक सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. शहर अभियंता शिरीष आरदवाड यांच्या नियंत्रणाखाली महापालिका क्षेत्रात २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन स्थळे निर्माण करण्यात आली होती. विद्युत व्यवस्थाही चोख ठेवण्यात आली होती. विसर्जन स्थळावरील ओले व सुके निर्माल्य लगेच उचलून नेण्यासाठी निमर्ल्य वाहतूक वाहने घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली सज्ज होती. वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत जवादे यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य पथकेही कार्यरत होती. तसेच अग्निशमन जवान आणि स्वयंसेवकही कार्यरत होते.

नवी मुंबई महानगरपालिकेने सर्व २२ नैसर्गिक विसर्जन स्थळांच्या कृत्रिम तलावांचा पर्याय उपलब्ध करून दिलेला असल्याने नागरिकांनी कृत्रिम तलावांमध्ये श्रीमूर्तींचे विसर्जन करून पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपला. महानगरपालिकेने केलेल्या सर्व प्रकारच्या चोख व्यवस्थेमुळे माघी गणेशोत्सवातील श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळा सुनियोजित पद्धतीने निर्विघ्नपणे पार पडला.

# राज्याची पोलीस यंत्रणा मुजोर राजकीय नेत्यांसमोर हतबल...!!




राज्याचे मुख्यमंत्री इतके हतबल ते फौजदारी गुन्ह्याखाली फरार असलेल्या एका मंत्र्यांच्या मुलाविरोधात काहीच बोलत नाहीत?, मंत्र्यांची मुले गुन्हा करून मोकाट फिरतात, ते मंत्र्यांच्या संपर्कात राहतात, परंतु पोलिसांना सापडत नाहीत ? तरीही मंत्री खुशाल मंत्रिमंडळात बसतात ?, या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था आहे की नाही?, असे रोखठोक प्रश्न कुठल्या विरोधकांनी नाही तर, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांनी उपस्थित केले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे कॅबिनेट मंत्री भरत गोगवले यांचा मुलगा विकास गोगावले याच्या अटकपूर्व जामीन याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली. या सुनावणीवेळी तब्बल ५० हून अधिक दिवस फरार असलेल्या विकास गोगावलेच्या प्रकरणात न्यायमूर्तींनी हे वक्तव्य केले. गेल्या महिन्यात अर्थात २ डिसेंबर २०२५ ला राज्यात नगपरिषदांच्या निवडणुका झाल्या. त्यादिवशी महाड नगरपरिषद निवडणुकीचे मतदान सुरू असताना प्रभाग क्र.२ मध्ये शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते. या राड्यात मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले व पुतण्या महेश गोगावले यांच्यावर अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करणे तसेच त्यांच्यावर रिव्हॉल्व्हर रोखण्याचे आरोप झाले होते. या आरोपाखाली पोलिसांनी विकास गोगावलेवर कलम ३०७ (जीवे मारण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्याचप्रमाणे माजी आमदार माणिक जगताप यांचे पुत्र आणि अजित पवार गटाचे नेते श्रीयांश जगताप यांच्यावरही महाड पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच विकास व महेश गोगावले हे दोघेही फरार झाले होते. या काळात पोलिसांनी दोघांच्या अटकेसाठी किती प्रयत्न केले हे कळण्यास मार्ग नाही, परंतु, दोघांनीही सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. हा जामीन अर्ज २३ डिसेंबर २०२५ रोजी न्यायालयाने फेटाळून लावला होता. कायदेशीर प्रक्रियेनुसार दोघांनीही पोलिसांसमोर हजर राहून जामीन मिळवणे अपेक्षित होते, मात्र तसे न करता त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. हे प्रकरण न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल पीठासमोर येताच न्यायमूर्तींनी राज्य सरकारसह पोलिसांना चांगलेच धारेवर धरले.

महेश गोगावलेने १४ जानेवारी २०२६ ला नवी मुंबईतील एका नोटरीसमोर हजर राहून प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी केली होती. त्याचा उल्लेख करताना पोलीस रेकॉर्डनुसार फरार असलेला आरोपी नोटरीसमोर हजर होऊ शकतो, तर तो पोलिसांना कसा सापडत नाही? यावरून पोलिसांचा कल आरोपींना वाचवण्याकडे आहे का?, असा प्रश्न न्यायमूर्तींनी केला. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहणे गरजेचे आहे. दबाव तुमच्यावर असेल, माझ्यावर नाही. ठरवून दिलेल्या वेळेपर्यंत विकास गोगावले शरण न आल्यास मी माझे आदेश जारी करणार, असा इशारा दिल्यानंतर शुक्रवारी विकास गोगावलेसोबत महाड राडा प्रकरणातील इतर सर्व फरार आरोपी महाड पोलिसांना शरण आले. भलेही हे दोघे पोलिसांसमोर शरण आले असले, तरी या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने राज्य सरकार आणि पोलीस यंत्रणेचे अक्षरशः वाभाडे काढले हे बरेच झाले म्हणा. मागच्या काही महिन्यांपासून राज्यात महिलांवरील अत्याचार, ड्रग्ज तस्करी, कोयता गँग आदी गुन्हेगारी कारवायांवरून राज्य सरकार सातत्याने टीकेचे धनी ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांसह आपल्याच पक्षातील प्रतिस्पर्धांना वेसण घालण्यात माहीर असले, तरी गृहखाते सांभाळताना त्यांच्या कार्यक्षमतेचा प्रभाव अजूनही दिसून आलेला नाही. सत्तेविरोधी भूमिका घेतली की, दारावर पोलीस, ईडी, सीबीआय, आयटी अथवा इतर तपास यंत्रणांची टकटक झालीच म्हणून समजा. परंतु सत्ताधारी पक्षातील मंत्री असो किंवा त्याच्या नातेवाईकाने कायदा धाब्यावर बसवून कुठलाही गुन्हा करावा आणि लपून बसावे. गेल्याच आठवड्यात ब्रिटनचे नागरिक असलेले डॉ. संग्राम पाटील यांना मुंबई पोलिसांनी विमानतळावरून पकडून आणत चौकशी केली होती. सत्ताधाऱ्यांविषयी टिप्पणी केल्याच्या आरोपाखाली त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. चौकशीला पूर्ण सहकार्य करूनही त्यांच्यावरील लुकआऊट सर्क्युलर पोलिसांनी मागे न घेतल्याने डॉ. संग्राम पाटील यांना ब्रिटनला परतता आले नाही. इमिग्रेशनच्या अधिकाऱ्यांनी त्यांना विमानतळावरून माघारी धाडले. अशा रितीने नातेवाईकांच्या भेटीसाठी आलेले डॉ. पाटील भारतातच अडकले आहेत. सध्या त्यांनीही न्यायालयात धाव घेत दाद मागितली आहे.

याउलट काही महिन्यांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीचा जमीन घोटाळा समोर आला होता. या प्रकरणात पार्थ पवार यांच्या भागीदारांवर, सरकारी अधिकाऱ्यांवर कारवाई सोडा. परंतु, एक साधी तक्रारही पार्थ पवारांच्या नावाने पोलिसांनी नोंदवली नाही. याचप्रकारे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगरमधील विट्स हॉटेलच्या लिलाव प्रक्रियेत गैरव्यवहार केल्याचा आरोप झाला होता. हे प्रकरणही असेच हवेत विरले. माजी मंत्री तानाजी सावंत यांनी रागाने घरातून निघालेल्या मुलाला रोखण्यासाठी पुण्यातील सर्व शासकीय यंत्रणा अवघ्या काही तासांत गरागरा फिरवली होती. विकास गोगावलेच्या जागी कुणी साधा कार्यकर्ता असता तर, कधीच गजाआड झाला असता. सर्वसामान्यांच्या कुठल्याही प्रकरणात तत्परतेने पोलीस चौकशी वा तपास झाल्याचे आठवत नाही. मंत्री महोदय आपल्या मुलाशी संपर्क साधून त्याला शरण यायला सांगतायत, अशी माहिती राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाला दिली होती. त्यानुसार विकास आणि महेश गोगावले दोघेही पोलिसांवर उपकार केल्याच्या थाटात शरण आले. याचाच अर्थ पोलिसांना शेवटपर्यंत त्यांना अटक करता आलीच नाही. यावरून केवळ मुख्यमंत्रीच नाही, तर राज्याची पोलीस यंत्रणा मुजोर राजकीय नेत्यांसमोर हतबल झाल्याचे विदारक चित्र राज्यातील जनतेने या निमित्ताने पाहिले आहे.

# सूर्यनारायणाला मनोभावे पुजण्याचा दिवस : रथसप्तमी

विश्वमंडळातील सूर्यनारायणाचे महत्त्व आपण सर्वच जण जाणतो. आपल्या दिवसाची सुरुवात सूर्योदयाने होते. पृथ्वीवरील समस्त सजीवांना ऊर्जा पुरवणारा एक महत्वाचा घटक म्हणूनही सूर्याचा उल्लेख केला जातो. सूर्यग्रहणाच्या दिवशी काही क्षणापुरता पडणारा अंधार आपल्याला नकोसा वाटतो त्यामुळे सूर्याशिवाय जगण्याची आपण कल्पनाही करू शकत नाही, एव्हढे महत्व सूर्यनारायणाला आहे. सजीव-निर्जीव सर्वांमध्ये भगवंताचा वास आहे त्यामुळे जीवनमानात आपल्याला साहाय्य करणाऱ्या प्रत्येकांप्रती कृतज्ञ राहण्याची शिकवण हिंदू धर्म देतो. आपल्याला साहाय्यभूत ठरणाऱ्या चराचर वस्तूंप्रती आणि जीवांप्रती कृतज्ञतेचा भाव आपल्या अंतरी सदैव राहावा यासाठी आपल्या ऋषीमुनींनी सण आणि उत्सवांची निर्मिती केली आहे. नागपंचमीला नाग पूजला जातो तर बैल पोळ्याच्या दिवशी शेतकरी मित्र बैलाचे पूजन केले जाते, वसुबारसला सवत्स गाईची पूजा केली जाते. दसऱ्याला शस्त्रपूजन केले जाते, पितृपक्षात पूर्वजांच्या नावे कावळ्याला घास दिला जातो. असे कितीतरी सण आहेत ज्यांची निर्मिती केवळ कृतज्ञतेच्या भावातून केली आहे.

रथसप्तमी हाही त्यातीलच एक सण. साऱ्या विश्वाला आपल्या तेजाने प्रकाशित करणाऱ्या सूर्यनारायणााला मनोभावे पुजण्याचा दिवस म्हणजे रथसप्तमी. सूर्यदेवाला साधना करतांना स्थिर उभे रहायला लागल्याने उभे राहून त्याला त्याची गति सांभाळता येत नव्हती. त्याचे पाय दुखू लागले आणि त्यामुळे त्याची साधना नीट होत नव्हती. त्याने परमेश्वराजवळ त्याविषयी तक्रार केली आणि बसण्याची व्यवस्था करण्यासंदर्भात सांगितले. 'मी बसल्यानंतर माझी गति कोण सांभाळणार', अशी त्याने परमेश्वराजवळ विचारणा केली. तेव्हा परमेश्वराने सूर्यदेवाला बसण्यासाठी सात अश्व असलेला सोन्याचा हिरेजडीत रथ तयार करून दिला. ज्या दिवशी सूर्यदेव त्या रथात विराजमान झाले, तो दिवस म्हणजे 'रथसप्तमी'. याचा अर्थ 'सात घोड्यांच्या रथ'. माघ महिन्यात सहस्रांशू नावाने सूर्याची पूजा करण्याची परंपरा आहे. असे केल्याने रोग आणि समस्या दूर होतात तसेच आयुर्मानही वाढते असे म्हटले जाते. माघ महिन्याच्या सप्तमीला सूर्यपूजा आणि उपवास केल्याने मनोकामना पूर्ण होतात, असेही पुराणात सांगितले आहे.

रथसप्तमीला सूर्योदयापूर्वी स्नान करावे. सूर्यदेवाची १२ नावे घेऊन १२ सूर्यनमस्कार घालावेत. पाटावर रथात बसलेल्या सूर्यनारायणाची आकृती काढून त्याची पूजा करावी. त्याला तांबडी फुले वाहावीत. सूर्याला प्रार्थना करून आदित्यहृदयस्तोत्रम्, सूर्याष्टकम् आणि सूर्यकवचम्, यांपैकी एखादे स्तोत्र भक्तीभावाने म्हणावे किंवा ऐकावे. रथसप्तमीच्या दिवशी कुठलेही व्यसन करू नये. रथसप्तमीच्या दुसऱ्या दिवसापासून प्रतिदिन सूर्याला प्रार्थना करावी आणि सूर्यनमस्कार घालावेत. त्यामुळे उत्तम आरोग्य प्राप्त होते. सूर्यकिरणांतून शरिराला आवश्यक असलेले 'ड' जीवनसत्त्व मिळते. काळाचे मोजमाप सूर्यावरच अवलंबून आहे. सूर्य हा ग्रहांचा राजा असून त्याचे स्थान नवग्रहांमध्ये आहे. तो स्थिर असून अन्य सर्व ग्रह त्याच्याभोवती प्रदक्षिणा घालतात. सूर्य स्वयंप्रकाशी असून अन्य ग्रह त्याचा प्रकाश घेतात. सूर्योपासनेला हिंदु धर्मात अधिक महत्त्व आहे. सूर्याला प्रतिदिन अर्ध्य दिल्याने अंधःकार नष्ट करून जग प्रकाशमय करण्यासाठी सूर्याला बळ मिळते असेही म्हटले जाते.

रांगोळीने किंवा चंदनाने पाटावर सात घोड्यांचा सूर्यनारायणाचा रथ, अरुण सारथी आणि रथात सूर्यनारायण काढतात. सूर्यनारायणाची पूजा करतात. अंगणात गोवऱ्या पेटवून त्यांवर एका बोळक्यात दूध उतू जाईपर्यंत तापवतात; म्हणजे अग्नीला समर्पण होईपर्यंत ठेवतात. त्यानंतर उर्वरित दुधाचा सर्वांना प्रसाद देतात. सुनेचे तीळवण, जावयाचे प्रथम वाण आणि बाळाचे बोरवण या दिवशी करतात. या वेळी सुनेला, जावयाला आणि बाळाला हलव्याचे दागिने करतात. स्वतः तप्त राहून साऱ्या सूर्यमंडळाला प्रकाशमान करणाऱ्या, कधीही विश्रांती न घेता अविरत सेवेत राहणाऱ्या सूर्यनारायणाच्या चरणी या रथसप्तमीच्या दिनी कोटी कोटी वंदन !

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# राष्ट्रीय मतदार दिन



स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे.

त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही.

संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तित्वात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

# दारु न दिल्याने बारमालकावर हल्ला !

**दि.२४, नाशिक :** रात्री परमिट रूम बंद करीत असताना मद्य देण्यास नकार दिल्याच्या रागातून सराइतासह त्याच्या साथीदारांनी बार मालकाच्या घरावर हल्ला चढवत अंगणातील दोन कार पेटवून दिल्या. स्फोटक पदार्थ फेकत थेट घर पेटविण्याचाही प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना गंगापूररोडवरील शिवाजीनगरमध्ये घडली. या प्रकरणी गंगापूर पोलिसांत तिघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

**काय घडलं नेमकं?**

गंगापूररोड भागातील शिवाजीनगर येथील विक्रांत योगेश गुळवे (वय ३०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, कार्बन नाका येथे त्यांचा बीअर बार आहे. बुधवारी (दि. २१) रात्री सुमारे १०.३० ते १०.४५ च्या दरम्यान बार बंद करताना संशयित कृष्णा राजपूत हा दोन अनोळखी साथीदारांसह कारमधून दारू मागण्यासाठी आला. त्याला परमिट रूम बंद असल्याचे सांगितल्यानंतर तिघांनी परमिट रूमच्या कामगारांना शिवीगाळ केली. त्यामुळे मालक गुळवे तेथे पोहोचले, तेव्हा राजपूतसह इतरांनी मद्याची मागणी केली असता त्यांनीही 'बार' बंद झाल्याचे सांगितले. त्याचा राग येऊन राजपूतने गुळवेंना 'तुला समजणारही नाही, कुठून चॉपर व बंदुकीतून गोळ्या येतील' अशी धमकी देत माझे नाव कृष्णा राजपूत आहे, असे सांगितले. यावेळी फिर्यादीने तातडीने ११२ क्रमांकावर कॉल करून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर संशयित तेथून निघून गेले. मात्र, याच रागातून सूड उगवण्याचा कट रचून संशयित गुरुवारी (दि. २२) मध्यरात्रीनंतर २.२० वाजेच्या सुमारास मोपेडवरून थेट गुळवेंच्या बंगल्याजवळ पोहोचले. त्यांनी बंगल्याच्या खिडकीवर बाटल्या फेकून काचा फोडल्या.

## घिसाडघाई

व्यवसाय वृद्धी साठी
शक्कलशोधली नवी
आम्ही देणार खात्रीने
क्वीक डिलिवरी हवी

अमूक वेळेत घरपोच
जाहिरात मोठी द्यावी
उशीर होता जरासाही
वस्तू फुकटात घ्यावी

कर्मचारी बांधे दावणी
हो खुशाल धावाधावी
खेळणे झाला माणूस
फिरवतरहायची चावी

भले घडू द्या अपघात
काळजीकुणास केवी
पाही डिलीव्हरी बॉय
ट्रॉफिक कितीही हेवी

कितीकेवढी प्रलोभने
चालते फसवा फसवी
जीव घेण्या या स्पर्धेत
नियमधाब्यावरबसवी

जाग आली प्रशासना
कायद्यानेअंकुश ठेवी
बंदी अशा क्रौर्य कर्मा
वाटे प्रसन्न झाली देवी

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज


# थोडक्यात

## खापरखेडा येथे मतदान जनजागृती रॅली



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** लोकशाही व्यवस्थेचा कणा असलेल्या मतदान प्रक्रियेबाबत तसेच विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रामाणिकतेची जाणीव निर्माण व्हावी. या उद्देशाने शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खापरखेडा येथे मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ही रॅली शाळेच्या प्रांगणातून सुरू होऊन पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे समाप्त झाली. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी हातात फलक व बॅनर घेऊन मतदान हा आपला अधिकार आहे, एक मत – सक्षम लोकशाही, कॉपीमुक्त परीक्षा – उज्ज्वल भविष्य, प्रामाणिकपणा हाच खरा यशाचा मार्ग अशा घोषणांनी परिसरात जनजागृतीचा संदेश दिला.

या उपक्रमाचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य अरूण वडस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. रॅलीनंतर विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी परीक्षांमध्ये प्रामाणिकपणे व आत्मविश्वासाने उत्तरे लिहिण्याचे महत्त्व सांगण्यात आले तसेच कॉपीमुक्त वातावरणातूनच गुणवत्तापूर्ण शिक्षण व सशक्त राष्ट्रनिर्मिती साध्य होऊ शकते, असे प्रतिपादन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक माहूरतळे, पर्यवेक्षिका चानीकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी पर्यवेक्षक टेकाडे, प्राध्यापिका वानखेडे, नेहारे व पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## नोकरदारांचा रिक्षा परवाना रद्द करा

### इको चालक मालक संघटनेचे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात निवेदन

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२४, पेण (रायगड) :** रायगड जिल्ह्यातील विक्रम, मिनिडोअर, टॅक्सी चालक मालक यांच्या अनेक प्रलंबीत मागण्यांबाबत शासन स्तरावर अनेक वर्षे अनेक आंदोलने, मोर्चे व आत्मदहनाचा मार्ग सुध्दा अवलंबावा लागला. तरी आजपर्यंत न्याय मिळाला नाही. त्यामुळे समस्या दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यात शासनाने राबविलेल्या परमिट हया धोरणामुळे ज्या लोकांना कायमस्वरूपी व कॉन्ट्रॅक्ट स्वरूपात नोकऱ्या आहेत. किंवा उत्पन्नाची इतर साधने आहेत. अशा लोकांनी देखील टॅक्सी परमिट घेऊन ते दुसऱ्याच्या मार्फत व्यवसाय करत आहेत अशा परवाना धारकांना वरती कारवाई करून परवाने रद्द करावे. अशा प्रकारचे निवेदन इको चालक मालक संघटनेने नुकतेच पेण येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यलयाचे अधिकारी माधव सूर्यवंशी यांना दिले आहे. तालुक्यात सुशिक्षित बेरोजगारांना खरोखरच व्यवसायाची गरज आहे त्यांनी उदरनिर्वाह चालवण्याकरता व्यवसाय करत आहेत. परंतु गरज नसताना तसेच नोकरीला असताना देखील रिक्षा व्यवसाय करत आहेत. इको चालकांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही. वाहनांसाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते कसे भरायचे, वाहनाचा मेंटेनन्स, विमा, कौटुंबिक खर्च कसा भागवायचा हा गंभीर प्रश्न ह्या व्यवसाय करत असलेल्या सुशिक्षित बेरोजगारा समोर आहे. ज्या लोकांनी प्रवासी वाहतूकीचे परमिट घेतलेले आहेत. परंतू ते स्वतः आपल्या नियुक्तीच्या ठिकाणी कामावर जाऊन तेथून पगार घेऊन परमिटद्वारे घेतलेल्या गाडीवर ड्रायव्हर ठेवून तेथून देखील उप्पन्न मिळवीत आहेत. ह्या आवश्यकता नसताना जास्तीच्या वाढलेल्या प्रवासी वाहनांमुळे खरोखरच इको चालक मालक संघटनेच्या चालकानावर उत्पन्ना परिणाम होत आहे. तरी आपण ह्याची गंभीर दखल घेऊन नोकरी करणाऱ्या परवाना धारकांची चौकशी होऊन योग्य ती कारवाई नाही केल्यास अन्यथ मंगळवार, दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जिते, पेण येथील कार्यालयासमोर विजयभाऊ पाटील (रायगड जिल्हा अध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली इको चालक मालक संघटना आमरण उपोषण करणार असल्याचे इशारा या निवेदनात म्हटले आहे. यावेळी संघटनेच्या अध्यक्ष विकास पाटील, उपाध्यक्ष अशोक पाटील, जयंत पाटील, गंगाराम जठार, विजय सोनवणे, प्रतीक गोरीवले, अमर बिकोट, समीर शिगवण, संतोष कचरे, बाळकृष्ण भोईर, दिनेश इंदुलकर, आदी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रात 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवाडा साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.२४, नागपूर :** महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रामध्ये 'मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा २०२६' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या सोहळ्यात मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पंधरवड्याचे औचित्य साधून अधिकारी, वीज कर्मचारी, कंत्राटी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी निबंध लेखन आणि घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर वाढावा आणि मराठी भाषेप्रती आदर निर्माण व्हावा हा या स्पर्धांमागचा मुख्य उद्देश होता. विजयी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख वक्त्या म्हणून शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेतील सहाय्यक शिक्षिका वेदिका ढगे उपस्थित होत्या. त्यांनी 'मराठी भाषेचे संवर्धन आणि आजची गरज' या विषयावर प्रबोधनात्मक मार्गदर्शन केले.

मराठी भाषेचा वारसा जपण्यासाठी प्रत्येकाने आपल्या बोलीभाषेचा आणि प्रमाणभाषेचा अभिमान बाळगला पाहिजे असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. याप्रसंगी मंचावर केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारवार, उपमुख्य अभियंता नारायण राठोड, नितीन रोकडे, अधिक्षक अभियंता विलासकुमार ऊके, प्रवीण रोकडे, कमलेश मुनेश्वर, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांच्या हस्ते वेदिका ढगे यांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला वीज केंद्रातील सर्व विभाग प्रमुख, कनिष्ठ व वरिष्ठ अभियंता तसेच मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन स्वीटी वाहने यांनी केले या कार्यक्रमामुळे संपूर्ण वीज केंद्र परिसरात मराठीमय वातावरण निर्माण झाले होते.

## १०० टक्के उद्दिष्ट गाठत मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजना यशस्वी करा - आ. जोरगेवार

### उपविभागीय कार्यालयात आढावा बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** चंद्रपूर विधानसभा मतदारसंघ पाणंद रस्त्यांनी युक्त करण्याचा आपला ठाम संकल्प असून मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी पायाभूत सुविधा सक्षम केल्या जाणार आहेत. मात्र या योजनेचा खरा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने सर्व विभागांमध्ये समन्वय साधत १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश आ. किशोर जोरगेवार यांनी दिल्या. मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात शुक्रवारी उपविभागीय कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद चौगुले, तहसिलदार विजय पवार, नायब तहसीलदार राजु धांडे, गट विकास अधिकारी संगीता भांगडे, वन परिक्षेत्र अधिकारी जि. आर नायगमकर, एस.व्ही मव्हेशंकर, उपकृषी अधिकारी व्ही. बी बुग्गेवार, महसुल अधिकारी व्ही.एम कुरेवार, के. टी मोडकवार, प्रविणकुमार वर्भे, विनोद गणफाडे, प्रकाश सुर्वे, भुकरमापक व्हि.डी. राठोड, तलाठी, एस. एन दुर्गे, एस. आर नगराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे के. एस. आश्राम, यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, शेतकऱ्यांना थेट शेतापर्यंत पोहोचता यावे, शेतीमालाची वाहतूक सुलभ व्हावी आणि ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात दर्जेदार आणि उपयोगी रस्ते तयार झाले पाहिजेत, याकडे प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे.

यावेळी आ. जोरगेवार यांनी विविध विभागांना ठोस सूचना दिल्या. वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागाने पाणंद रस्त्यांच्या दोन्ही बाजूंनी वृक्षारोपण करावे, अतिक्रमित पाणंद रस्ते मोकळे करावे, तसेच ग्रामपंचायतींकडून आवश्यक प्रस्ताव मागवावेत, असे त्यांनी सांगितले. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने आतापर्यंत झालेल्या कामांची स्वतंत्र छाननी करावी, सध्या किती पाणंद रस्ते प्रत्यक्ष वापरात आहेत याचे सर्वेक्षण करावे आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन नियोजनबद्ध आराखडा तयार करावा, अशाही स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या. या बैठकीत योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कालबद्ध कार्यवाही, विभागनिहाय जबाबदारी निश्चित करणे आणि नियमित आढावा घेण्यावर भर देण्यात आला. पाणंद रस्ते म्हणजे केवळ रस्ता नाही, तर शेतकऱ्यांच्या कष्टाला बाजारपेठेपर्यंत पोहोचवणारा मार्ग आहे. त्यामुळे दर्जेदार काम, योग्य नियोजन आणि वेळेत अंमलबजावणी यावर भर दिला पाहिजे. या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मी स्वतः नियमित आढावा घेणार आहे. चंद्रपूर मतदारसंघातील प्रत्येक शेतकरी या योजनेचा लाभार्थी झाला पाहिजे, असे ते यावेळी म्हणाले.

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वतीने राष्ट्रीय बालिका दिन साजरा

### मासिक पाळी नैसर्गिक; बालविवाह अमानवी कृत्य - राहुल बिराजदार यांचे प्रतिपादन

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२४, सोलापूर :** येणाऱ्या भारताचे भवितव्य घडविणाऱ्या आजच्या बालिकेच्या हातात अभ्यासक्रमासोबत स्वतःच्या शरीराची, आरोग्याची व हक्कांची जाणीव जागृती करून देणे ही काळाची गरज आहे आणि मासिक पाळी नैसर्गिक असून बालविवाह हे अमानवी कृत्य असल्याचे प्रतिपादन लैंगिकता शिक्षण प्रबोधक राहुल बिराजदार यांनी प्रतिपादन केले. राष्ट्रीय बालिका दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरच्या वतीने छत्रपती शिवाजी प्रशाला येथे आयोजित किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन,




किशोरी आरोग्य, पोषक आहार, बालविवाह प्रतिबंध आणि शासकीय योजनांविषयी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मासिक पाळी ही लाजेची गोष्ट नसून सृष्टीच्या नवनिर्मितीची नैसर्गिक प्रक्रिया आहे. बालविवाह हे बालिकेच्या शरीरावर अन्याय करणारे आणि समाजाच्या मानसिकतेवर गडद कलंक उमटवणारे अमानवी वास्तव आहे, असे मत राहुल बिराजदार यांनी मांडले. किशोरी वयात योग्य पोषक आहार न मिळाल्यास शरीर व मन दोन्ही कमकुवत होते, याची जाणीव करून देत लोहयुक्त अन्न, हिरव्या पालेभाज्या, डाळी, फळे, दूध आणि पुरेसे पाणी पिण्याचे महत्त्व डॉ. सिद्धी चाकोते यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात बेटी बचाओ बेटी पढाओ, सुकन्या समृद्धी योजना, पोषण अभियान, पीएम पोषण योजना यांसारख्या शासकीय योजनांची माहिती देत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण हे बालिकेच्या पाठीशी उभे आहे, हा विश्वास मुलींमध्ये निर्माण करण्याचा हेतू असून या जनजागृती कार्यक्रमामुळे बालिकांच्या जीवनात आत्मभानाचा प्रकाश आणि भविष्याकडे पाहण्याचा आत्मविश्वास दिसून आल्याचे आणि हाच राष्ट्रीय बालिका दिनाचा खरा अर्थ असल्याचे मत मुख्याद्यापिका तथा कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुजाता जुगदार यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली विधी सेवेच्या कर्मचाऱ्यांनी व प्रशालेच्या शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## बहुप्रतिक्षित संस्कृती आर्ट फेस्टिवल कला संगमाची विठ्ठलवारी

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.२४, ठाणे :** ठाणेकरांचा बहुप्रतिक्षित असा संस्कृती आर्ट

फेस्टिव्हल दि.०६ फेब्रुवारी ते दि.०९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान उपवन तलाव येथे आयोजित करण्यात येणार आहे. यंदाचा फेस्टिव्हल 'कला संगमाची विठ्ठलवारी' या संकल्पनेवर आधारित आहे. याची अधिकृत घोषणा आज पत्रकार परिषदेद्वारे केली. युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक, संस्कृती आर्ट फेस्टिव्हलचे सेक्रेटरी मनोज पिल्लई आणि इतर मान्यवर उपस्थित होते. दिनांक ०६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध शास्त्रीय



गायक पंडित आनंद भाटे यांच्या सुरेल स्वरांनी संस्कृती आर्ट फेस्टिव्हलचा उद्घाटन सोहळा रंगणार आहेत. दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी ज्येष्ठ गायक आनंद शिंदे आणि आदर्श शिंदे ही पिता-पुत्राची जोडी शिंदेशाही या कार्यक्रमातून रसिकांची मन जिंकतील. दिनांक ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी बॉलीवूडचे सुप्रसिद्ध गायक शान यांच्या सुमधुर आवाजाने सुरेल संध्या रंगेल. दिनांक ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी तारक मेहता फेम कवी व अभिनेते शैलेश लोढा यांची काव्य मैफल रंगणार आहे.

याचबरोबर ज्येष्ठ कथ्थक नृत्यांगना मंजिरी देव, ज्येष्ठ अभिनेत्री सुधा चंद्रन, ओडिसी नृत्यांगना सुजाचा मोहपात्रा, भरतनाट्यम् कलाकार दीपक मुजुमदार अशा दिग्गजांचे सादरीकरण होणार आहे. तसेच लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, सुफी संगीत, भारूड, पोवडा, अभंग आदींचा सुंदर मिलाफ फेस्टिव्हल मध्ये रसिकांना अनुभवता येणार आहे. याचबरोबर विविध कार्यशाळा, धाडसी खेळांचे प्रात्यक्षिक, चित्रप्रदर्शनाचाही समावेश आहे. ठाणेकरांनी संस्कृती आर्ट फेस्टिव्हलमध्ये सहभागी होऊन विविध कलांचा मनमुराद आनंद घ्यावा.असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

## वलनी कॉलनीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाचा भक्तीमय सोहळा संपन्न

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि २३, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील वलनी कॉलनी परिसरात अध्यात्माची गंगा अवतरली होती. दिनांक १४ जानेवारी ते दिनांक २१ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला 'श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह' अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. वृंदावन धाम येथील विख्यात कथाव्यास (भागवत किंकर) आचार्य सुबोधानंद महाराज यांच्या रसाळ वाणीतून प्रवाहित झालेल्या कथा श्रवणाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला.या आध्यात्मिक सोहळ्याचा प्रारंभ १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता अत्यंत शास्त्रोक्त पद्धतीने झाला. श्री चित्रकूट धाम येथील ह.भ.प. बालाप्रसादजी पांडे यांच्या शुभहस्ते कलश स्थापना करण्यात आली. यावेळी टाळ-मृदंगाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सप्ताहाच्या पहिल्या दिवसापासूनच भाविकांची मोठी गर्दी दिसून आली.वृंदावनहून पधारलेले आचार्य सुबोधानंद महाराज यांनी श्रीमद भागवतातील कृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पूजा, रुक्मिणी स्वयंवर आणि सुदाम भेटीचे प्रसंग अत्यंत प्रभावीपणे मांडले. त्यांच्या वाणीतील गोडवा आणि रसाळ विवेचनामुळे श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. दैनिक कार्यक्रमात सकाळी ९ ते १२ भागवत कथा, दुपारी १ ते ३ श्रीमद भागवत परायण, सायंकाळी ५ ते ७ भक्तीमय भजन आणि रात्री ७ ते १० पुन्हा श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे वलनी परिसरातील सर्व धर्मीय बांधवांनी यात हिरीरीने सहभाग नोंदवला, ज्यामुळे सामाजिक ऐक्याचे दर्शन घडले. विशेषतः महिला भाविकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. दररोज होणाऱ्या भजनांच्या कार्यक्रमात महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून भक्तीरसाचा आनंद घेतला.सप्ताहाच्या सांगता दिनी, २१ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता भव्य 'दिंडी पालखी सोहळा' काढण्यात आला. नगर फेरीच्या माध्यमातून संपूर्ण वलनी कॉलनी परिसरात हरिनामाचा गजर झाला. दुपारी १ ते ३ या वेळेत गोपाल काला व कीर्तनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर सायंकाळी ४ वाजेपासून



भव्य महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. परिसरातील हजारो नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.या भव्य सोहळ्याचे यशस्वीतेसाठी मिथिलेश ठाकूर, वासुदेव राव, सुभाष कोसेकर, प्रकाश खापरे, अरविंद सरोदे, श्यामप्रीत भारद्वाज व वीरेन्द्र झा यांनी लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश कोसेकर, लोकेश भक्ते, आकाश इवनाते, विक्की विंचूरकर, महेन्द्र अन्ना, सौम्य कोसेकर, सुरज भारद्वाज व समस्त वलनी कॉलनीवासीयांनी अहोरात्र परिश्रम घेतले. वलनी कॉलनीच्या इतिहासातील हा एक संस्मरणीय सोहळा ठरला, अशी भावना भाविकांनी व्यक्त केली.

# मतदान प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीचे पहिले मुल्य

## अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ.व्यवहारे यांचे प्रतिपादन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२४, चंद्रपूर :** भारतीय स्वातंत्र्यापासूनच आपल्याला मतदानाचा अधिकार मिळाला आहे. आपल्या लोकशाहीची मूल्ये बालपणापासूनच आपल्या मनामध्ये रुजली पाहिजे. आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भवितव्य ठरवणार आहे, त्यामुळेच राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना येथे आमंत्रित करण्यात आले आहे. १७ व्या वर्षी आपण मतदार नोंदणी करु शकतो. व १८ वर्ष पूर्ण झाल्यावर मतदानासाठी पात्र ठरतो. कारण मतदान प्रक्रियेत सहभागी होणे हे लोकशाहीचे पहिले मुल्य आहे, असे प्रतिपादन अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे यांनी केले.



दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी शासकीय सुट्टी आल्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने २३ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय मतदान दिन साजरा करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने नियोजन भवन येथे आयोजित कार्यक्रमात डॉ. व्यवहारे बोलत होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी विशालकुमार मेश्राम, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शुभम दांडेकर, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादूरकर, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर, चंद्रपूरचे तहसीलदार विजय पवार, तहसीलदार (सामान्य) प्रिया कवळे, आदी उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार म्हणाले, संपूर्ण भारतात आज राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात येत आहे. निवडणुकांमध्ये मतदार हा सर्वात म हत्वाचा असल्यामुळे मतदार नोंदणी करणे आवश्यक आहे. भारतात प्रत्येकाला एकाच मताचा अधिकार दिला आहे. मतदान न करणे अतिशय दुर्दैवी असून मतदान करुन लोकशाही प्रक्रियेत सहभागी होणे हे आपले कर्तव्य आहे. आता वर्षातून चार वेळा मतदार नोंदणी करता येते.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी शुभम दांडेकर म्हणाले, निवडणुका ह्या लोकशाहीचा अविभाज्य घटक आहे. मुक्त आणि नि:पक्ष वातावरणात पारदर्शकपणे निवडणूका घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग ही स्वत्तंत्र यंत्रणा अस्तित्वात आहे. संविधान सभेत 'मतदानाचा सार्वत्रिक अधिकार' या कलमावर सर्वांचेच एकमत झाले होते. त्यामुळे देशाच्या उज्वल भविष्यासाठी म तदार नोंदणी करा, असे आवाहन त्यांनी केले.

# मंडणगडमध्ये कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.२४, दापोली (रत्नागिरी)** : तालुका विधी सेवा समिती दापोली अंतर्गत दिवाणी न्यायालय मंडणगड, मंडणगड तालुका वकील संघटना व लोकनेते गोपीनाथजी मुंडे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा' व 'राष्ट्रीय युवा दिन' कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रम ास मार्गदर्शक म्हणून मंडणगड तालुका वकील संघटनेचे विधीज्ञ ॲड.अमोल बैकर व मंडणगड येथील सहायक सरकारी अभियोक्ता ॲड.सतीश नाईक उपस्थित होते. मंडणगड न्यायालयाच्या दिवाणी न्यायाधीश अमृता जोशी यांची सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लाभली.

तसेच विशेष उपस्थिती म्हणून मंडणगड तालुका वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड.मिलिंद लोखंडे उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर, डॉ.अशोक साळुंखे, डॉ.भरतकुमार सोलापुरे, डॉ.संगीता घाडगे, ग्रंथपाल डॉ.दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम ाच्या सुरूवातीला प्राचार्य डॉ.वाल्मिक परहर यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले. तत्पूर्वी आर.सी. मोहिते यांनी कार्यक्रम ाचे प्रास्ताविक करुन कार्यक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. 'रस्ते सुरक्षा व ट्रॉफीक सिग्नल' या विषयावर बोलताना ॲड. अमोल बैकर यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, वाहन चालवत असताना कोणकोणते कागदपत्र आपल्या सोबत बाळगणे गरजेचे आहे. तसेच वाहन चालवत असताना कांही धोका झाल्यास काय करणे आवश्यक आहे, आपण रस्त्याने प्रवास करत असताना रस्त्यावर वाहतुकीच्या नियमांची चिन्हे लावलेली असतात. आपण त्याचाही अभ्यास करणे आवश्यक आहे. तसेच शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचे असून आपण सर्वांनी सदर नियम ांचे पालन केल्यास आपला प्रवास नक्कीच सुखकर होण्यास मदत होईल. आपण कोणत्याही प्रकारचे वाहन चालवत असताना काळजी घेणे आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले. 'राष्ट्रीय युवा दिन व आजचा तरुण' या विषयावर बोलताना ॲड. सतीश नाईक यांनी




सांगितले की देशाच्या विकासामध्ये युवकांचे खूप मोठे योगदान असे सांगून युवकांनी स्वामी विवेकानंदांचे विचार आचरणात आणावे व समाजहितासाठी जनजागृती करावी. तसेच आजच्या तरुणांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच युवकांनी व्यसनाधीनतेपासून दूर राहून विधायक कार्यासाठी आपली शक्ति वापरावी असेही सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना दिवाणी न्यायाधीश श्रीमती अमृता जोशी यांनी सांगितले की, नागरिकांचे संरक्षण करणे हा कायद्याचा मुख्य उद्देश असतो. कायदा हा अन्यायापासून संरक्षण करीत असतो. म्हणून अशा कायद्यांची माहिती आपणांस असणे अतिशय महत्त्वाचे असते. पोक्सो कायदा हा बालकांचे लैंगिक छळ आणि शोषण यापासून संरक्षण करण्यासाठी कायदेशीर तरतूद मजबूत करण्यासाठी करण्यात आला आहे. हा कायदा लिंग-निरपेक्ष असून यात लैंगिक शोषण आणि पोर्नोग्राफीच्या गुन्हयांसाठी कठोर शिक्षेची तरतूद आहे. तसेच तपास आणि खटल्यासाठी बाल-स्नेही प्रक्रिया आणि विशेष न्यायालयाची स्थापना करण्याचीही तरतूद यामध्ये आहे. कार्यक्रमास मंडणगड न्यायालयातील सर्व कर्मचारी, महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी वर्ग म ोठया संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर.सी. मोहिते यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार डॉ. संगीता घाडगे यांनी मानले.

# डॉ.सचिन पाटील यांची महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य सेवा सहायक संचालक पदी निवड



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यातील मोरगिरी प्राथमिक आरोग्य केंद्रातून सुरू झालेला सेवाभावाचा प्रवास आज थेट मंत्रालयापर्यंत पोहोचला आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांच्या आरोग्यासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे डॉ.सचिन आनंदराव पाटील यांची आरोग्य सेवा आयुक्तालयात सहायक संचालक पदावर निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असताना पाटण तालुका व सातारा जिल्ह्यात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉ.सचिन पाटील यांनी आपल्या सेवेची सुरुवात पाटण तालुक्यातील अत्यंत दुर्गम अशा मोरगिरी प्राथमिक आरोग्य केंद्रातून केली. या ठिकाणी त्यांनी सलग १३ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली. डोंगराळ परिसर, अपुरी वाहतूक व्यवस्था, मर्यादित साधनसामग्री आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या अडचणी असूनही त्यांनी कधीही सेवेत कसूर केली नाही. रात्री-अपरात्री रुग्णांसाठी धाव घेणे, गरोदर मातांची काळजी घेणे, लसीकरण मोहिमा राबवणे, संसर्गजन्य आजारांवर नियंत्रण ठेवणे, क्षयरोग रुग्णांवर उपचार करणे अशी जबाबदारी त्यांनी निष्ठेने पार पाडली.

यानंतर त्यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र सोनवडे येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम केले. पुढे प्रभारी जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच प्रभारी जिल्हा क्षयरोग अधिकारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. प्रत्येक पदावर त्यांनी प्रामाणिकपणा, शिस्त आणि कार्यक्षमतेचा ठसा उमटवला. डॉ.सचिन पाटील हे मुळचे पाटण तालुक्यातील मंद्रुळकोळे या गावचे त्यांचे वडील अँड. आनंदराव पाटील हे वकीली निमित्त पाटण येथेच राहत असल्याने त्यांचे बालपण, प्राथमिक शिक्षण ते हायस्कूल पर्यंतचे विद्यालयीन शिक्षण पाटण येथे पूर्ण झाले. त्यांनी पुढे एमबीबीएस, डिपीएच, एमडी, पीएसएम पर्यंतचे आरोग्य क्षेत्रातील शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षीत होऊन देखील त्यांनी मातीशी नाळ तोडली नाही. प्राथमिक शाळा आणि जुन्या मित्रांच्या सहवासात त्यांना राहायला आवडते. सातारा येथे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी असताना कोवीड काळातील आरोग्य क्षेत्रातील योगदान सातारा जिल्ह्यासाठी फार मोलाचे ठरले आहे. सर्व सामान्य कुटुंबातून उच्च शिक्षीत होऊन महाराष्ट्र राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्तालयात सहायक संचालक पदावर निवड झाली आहे. ही त्यांच्या मित्र परिवारासह पाटण तालुक्यासह सातारा जिल्ह्यात अभिमानास्पद बाब आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असताना मित्रपरिवाराने त्यांचे अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनात कळंबच्या आयटीआयचे यश

## ट्रॅक्टर मेकॅनिक व कोपा व्यवसायाचे प्रोजेक्ट विभागीय स्तरासाठी निवड

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.२४, धाराशिव :** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कौशल्यात भर पडावी तसेच संशोधनात्मक वृत्ती विकसित होऊन रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, या उद्देशाने दरवर्षी तंत्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. याच अनुषंगाने धाराशिव येथील भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत दि.२३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.या तंत्रप्रदर्शनात जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांम धील प्रशिक्षणार्थ्यांनी विविध नावीन्यपूर्ण प्रोजेक्ट सादर केले. जिल्ह्यातील प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तीन प्रोजेक्टची निवड जिल्हास्तरासाठी करण्यात आली होती.



या स्पर्धेत संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब येथील प्रशिक्षणार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. संस्थेच्या ट्रॅक्टर म ेकॅनिक व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी 'एनर्जी सेव्हर स्प्रेअर', तर कोपा (उजझअ) व्यवसायाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी 'वेबसाईट – लॉस्ट अँड फाउंड' हा प्रोजेक्ट सादर केला. या दोन्ही प्रोजेक्टची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनात आठ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व एक खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अशा एकूण नऊ संस्थांमधून २९ प्रोजेक्ट सादर करण्यात आले होते. त्यामधून संतश्रेष्ठ गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कळंब येथील ट्रॅक्टर मेकॅनिक व कोपा व्यवसायाच्या प्रोजेक्टची निवड करण्यात आली.निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रविण औताडे, शासकीय तंत्रनिकेतन स्वंचल विभागाचे प्रमुख एल. एम. माने तसेच संस्था व्यवस्थापन समितीचे निशांत होणमुटे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य, शिल्पनिदेशक, शिल्पनिदेशिका तसेच प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे प्राचार्य केशव पवार, गटनिदेशक शामकांत डोंगे, तसेच सर्व शिल्पनिदेशक व शिल्पनिदेशिकांनी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले.

# थोडक्यात

## धुंदलवाडी आश्रमशाळा कलागुणांनी दुमदुमली

### केंद्रस्तरीय 'विविध गुणदर्शन' स्पर्धेत बालकलाकारांचा ठसा

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.२४, डहाणू (पालघर)** : पालघर जिल्ह्यातील धुंदलवाडी येथील अनुदानित आश्रमशाळेत झालेल्या केंद्रस्तरीय 'विविध गुणदर्शन' स्पर्धेने संपूर्ण परिसर अक्षरशः दुमदुमून टाकला. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ठसठशीत आणि आत्मविश्वासपूर्ण कलाप्रदर्शनामुळे ही स्पर्धा केवळ कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा ठळक आविष्कार ठरली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. उद्घाटनप्रसंगी वसंत सादडे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत कला आणि क्रीडाक्षेत्रातही निर्भीडपणे आपली ओळख निर्माण केली पाहिजे, असे स्पष्ट मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुंदलवाडी गावच्या सरपंच प्रभावती महिला उपस्थित होत्या. डहाणू प्रकल्पातील सहाय्यक प्रकल्प अधिकारी बन्सीलाल पाटील यांनी आदिवासी विकास विभागाच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होत असल्याचे ठामपणे सांगितले. शिक्षण विस्तार अधिकारी श्रीनाथ थोंबले यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणावर समाधान व्यक्त करत त्यांच्या गुणवत्तेची दखल घेतली.

या स्पर्धेत तवा केंद्रांतर्गत येणाऱ्या आठ आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. नृत्य, गायन, अभिनय, भाषण आणि विविध सर्जनशील कलाप्रकारांतील सादरीकरणांनी उपस्थित प्रेक्षकांना खिळवून ठेवले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वास, सादरीकरणातील नेमकेपणा आणि अभिव्यक्तीतील धार यामुळे प्रत्येक सादरीकरणाने स्वतंत्र ठसा उमटवला. कार्यक्रमाचे काटेकोर आणि शिस्तबद्ध नियोजन धुंदलवाडी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक उल्हास वसंत सातवी आणि प्रित नगराळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळेतील शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. या केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतांना दिशा मिळाली असून, आदिवासी भागातील शिक्षण केवळ अभ्यासापुरते मर्यादित नसून सर्वांगीण विकासाकडे वाटचाल करत असल्याचे ठळकपणे अधोरेखित झाले आहे.

## बेलापूर, सानपाडा आणि तुर्भे येथील व्यावसायिक मालमत्ता जप्त

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत थकबाकीदारांविरोधात जप्तीची कठोर कारवाई सुरु करण्यात आली असून ही मोहीम अधिक वेगाने राबविण्यात येत आहे. दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजीच्या ३ मालमत्ता जप्ती कारवायांनंतर दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी बेलापूर सीबीडी येथील सेक्टर ११, सानपाडा येथील सेक्टर २४ आणि तुर्भे येथील सेक्टर १९ई येथील व्यावसायिक मालमत्तांवर महापालिकेची जप्ती कारवाई करण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्दे शानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार व उपायुक्त डॉ.अमोल पालवे यांच्या म ार्गदर्शनाखाली शहरामध्ये विविध भागांतील दीर्घकाळ कर थकीत असलेल्या मालम त्तांवर जप्ती पथकाकडून थेट सील व जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. वारंवार सूचना व नोटिसा बजावूनही जे मालमत्ताधारक मालमत्ताकर भरण्यास टाळाटाळ करीत आहेत, अशा थकबाकीदारांवर कोणतीही सवलत न देता कठोर कारवाई करण्यात येत आहे. येत्या काळातही ही मोहीम अधिक गतिमान स्वरूपात सुरू राहणार आहे. तसेच जप्तीची कारवाई टाळण्यासाठी मालमत्ता कर थकबाकी असलेल्या सर्व मालम त्ताधारकांनी तात्काळ आपला थकीत मालमत्ता कर भरावा असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## रस्ता सुरक्षा अभियान – २०२६ अंतर्गत कासा येथील विद्यालयात चारोटी वाहतूक पोलिसांकडून जनजागृती कार्यक्रम

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२४, डहाणू (पालघर)** : रस्ता अपघातांचे वाढते प्रमाण लक्षात घेता आणि विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच वाहतूक नियमांची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत महामार्ग पोलीस मदत केंद्र, चारोटी यांच्या वतीने पूज्य आचार्य भिसे म ाध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कासा येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित या कार्यक्रमात इयत्ता ११ वीतील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व लेखी परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे महत्त्व, अपघात टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी तसेच जबाबदार नागरिक म्हणून रस्त्यावर वावरताना पाळावयाच्या शिस्तीबाबत विचार करण्याची संधी देण्यात आली.



कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना रस्त्याने चालताना, दुचाकी अथवा चारचाकी वाहनाने प्रवास करताना, तसेच पालक, नातेवाईक किंवा मित्रांसोबत वाहनात बसताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. हेल्मेट व सीट बेल्टचा वापर, वेगमर्यादा, झेब्रा क्रॉसिंगचे महत्त्व, मोबाईलचा वापर टाळणे, तसेच अल्पवयीनांनी वाहन चालवू नये, यासारख्या मुद्द्यांवर विशेष भर देण्यात आला.

या उपक्रमाचा समारोप वाहतूक सुरक्षा शपथ घेऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सुरक्षित व जबाबदार नागरिक होण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. याच अनुषंगाने शाळेत पालक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी उपस्थित पालकांना देखील रस्ता सुरक्षा, अपघात प्रतिबंध आणि मुलांमध्ये योग्य सवयी रुजवण्याबाबत मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली.

हा कार्यक्रम महामार्ग पोलीस मदत केंद्र, चारोटी येथील पोलीस उप निरीक्षक महेबुब मकानदार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे पार पडला. अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्ये ही वाहतूक नियमांबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.